कौशल्य विकास व उदयोजकता विभाग (खुद्द) आस्थापनेवरील अस्थायी पदांना दि.०१/०३/२०१८ ते दि.३०/०९/२०१८ पर्यन्त मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उदयोजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक- कौविउ-२०१७/प्र.क्र. ३००/प्रशा-१
दुसरा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १९ मार्च,२०१८.

वाचा :-१) शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक- आढावा- २००१/ प्र.क्र.१०९ /प्रशा-१, दि.०५.०३.२००३

२) शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक-इएसई-२०१५/प्र.क्र.३७ /प्रशा-१ दि. २०/०२/२०१५.

३) शासन निर्णय, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, क्रमांक- कौविउ -२०१५/प्र.क्र.०७ /प्रशा-१ दि. ११/०६/२०१५.

४) शासन निर्णय क्र. कौविउ-२०१६/ प्र.क्र.५० / प्रशा-१, दि. १८ /०३/२०१६.

५) शासन निर्णय क्र. कौविउ-२०१६/ प्र.क्र.५० / प्रशा-१, दि. ०४/१०/२०१६.

६) शासन निर्णय क्र. कौविउ-२०१७/ प्र.क्र.७३ / प्रशा-१, दि. ०७/०३/२०१७.

७) वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.पदनि -२०१६ / प्र.क्र.८ / १६ / आ.पु.क. दि.३ ऑक्टोंबर २०१७.

८) शासन निर्णय क्र. कौविउ-२०१७/ प्र.क्र.३०० / प्रशा-१, दि. १३ /१० /२०१७.

९) वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.पदनि -२०१६ / प्र.क्र.८ / १६ / आ.पु.क. दि.८ जानेवारी , २०१८.

१०) शासन निर्णय क्र.कौविउ-२०१७/प्र.क्र.३००/प्रशा-१,दिनांक २०/०१/२०१८

११) वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.०५/०३/२०१८

शासन निर्णय :-

कौशल्य विकास व उदयोजकता विभागाच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारीत आकृतिबंध वरील संदर्भांधिन क्रमांक -१ येथील दि.५ मार्च २००३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेला आहे.

२. वित्त विभागाच्या दि.०३ /१० /२०१७ च्या शासन निर्णयान्वये वित्त विभागामार्फत प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन कौशल्य विकास व उदयोजकता विभागाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील ४८ अस्थायी पदांना उपरोक्त संदर्भांधिन क्रमांक-१० येथील दिनांक २०/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

३. आता वित्त विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.११ येथील दि.०५/०३/२०१८ अन्वये विभागातील अस्थायी पदांना दिनांक ०१/०३/२०१८ ते दिनांक ३०/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी प्रशासकीय विभागांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने कौशल्य विकास व उदयोजकता विभागाच्या (खुद्द) आस्थापनेवरील विविध संवर्गातील ४८ अस्थायी पदांना दि.०१/०३/२०१८ ते दि.३०/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे. याबाबतचा सविस्तर तपशील सोबतच्या विवरणपत्र " अ ”मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

४. कौशल्य विकास व उद्योजकता विभागातील ४८ अस्थायी पदांसाठी होणारा खर्च मागणी क्रमांक, “झेडए-२, २२५१, सेक्रेटरीएट सामाजिक सेवा सेक्रेटरीएट (०१) (०१) रोजगार व स्वयंरोजगार विभाग (२२५१ ०५१६) दत्तमत” या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. शासन निर्णय वित्त विभागाच्या उक्त संदर्भ क्र.११ येथील ०५/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकी विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून संकेतांक २०१८०३१९१६५४२१३१०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ashok Wamanrao Jadhav

Digitally signed by Ashok Wamanrao Jadhav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c7fb596c94246a438bbdce448b140fa6095d5602448a3a0f22d6b02f640dd1e9, serialNumber=aba17556b7d79687516736c49ed1b0aaa4b428f86247b2362aada2eac883a720, cn=Ashok Wamanrao Jadhav
Date: 2018.03.19 16:56:07 +05'30'

(अशोक वा. जाधव)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई
२. अधिदान व लेखा अधिकारी , अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
४. वित्त विभाग, (व्यय-६/वित्तीय सुधारणा), मंत्रालय,मुंबई
५. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १८, र. व का.),मंत्रालय,मुंबई
६. रोख शाखा, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग,
७. निवड नस्ती (प्रशा-१)

विवरणपत्र -अ

शासन निर्णय क्रमांक-कौविउ-२०१७/प्र.क्र.३००/ प्रशा -१,दिनांक १९ मार्च,२०१८ अन्वये ४८ अस्थायी पदांना दि.०१/०३/२०१८ ते दि.३०/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.

अ.क्र.	पदांचा संवर्ग	पदांची संख्या	वेतनश्रेणी (६ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत संरचनेतील वेतनश्रेणी)
१	प्रधान सचिव	१	वेतन बँड रु. ६७०००-७९०००/-
२	उप सचिव	२	वेतनबँड रु.१५६००-३९१००, ग्रेड पे रु.७६००/-
३	विशेष कार्य अधिकारी (उप सचिव दर्जा गट-अ)	२	वेतनबँड रु.१५६००-३९१००, ग्रेड पे रु.७६००/-
४	अवर सचिव	१	वेतनबँड रु.१५६००-३९१००, ग्रेड पे रु.६६००/-
५	वरिष्ठ स्वीय सहायक	१	वेतनबँड रु १५६००-३९१००, ग्रेड पे ६६००
६	निवडश्रेणी लघुलेखक	१	वेतनबँड रु ९३००-३४८००, ग्रेड पे ४६००
७	कक्ष अधिकारी	६	वेतन बँड रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४८००/-
८	सहायक कक्ष अधिकरी	९	वेतन बँड रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४३००/-
९	संगणक सहायक	३	वेतन बँड रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४३००/-
१०	उच्चश्रेणी लघुलेखक	२	वेतन बँड रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४४००/-
११	निम्नश्रेणी लघुलेखक	३	वेतन बँड रु.९३००-३४८०० , ग्रेड पे रु.४३००/-
१२	लघुटंकलेखक	१	वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु.२४००/-
१३	रोखपाल (लिपीक-टंकलेखक)	१	वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु.१९००/-
१४	देयक-लिपीक(लिपीक-टंकलेखक)	१	वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु.१९००/-
१५	लिपीक-टंकलेखक	८	वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु.१९००/-
१६	वाहन चालक	२	वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु.१९००/-
१७	शिपाई	४	वेतन बँड रु. ४४४०-७४४०, ग्रेड पे रु.१३००/-
	एकूण	४८	